अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | बुधवार
२८.१०.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

| वर्ष: ०७ | अंक: २६८ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२ |
|---|---|---|---|

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### १२ खेळाडूंना मिळणार २४ लाख रुपये

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये निवड झालेल्या राज्यातील १२ खेळाडूंना प्रशिक्षण आणि स्पर्धेच्या अनुषंगाने आर्थिक सहाय्य देण्यासाठी राज्य सरकारने २४ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यानुसार प्रत्येक खेळाडूला दोन लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. राज्याच्या क्रीडा संस्कृतीचे संवर्धन करणे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना आर्थिक मदत करणे, या उद्देशाने राज्य क्रीडा विकास निधीला अंशदान देण्याची योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत २०२४-२५ आणि २०२५-२६ या आर्थिक वर्षांतील पात्र खेळाडूंच्या प्रस्तावांची तपासणी करून क्रीडा आणि युवक सेवा संचालनालयाने शिफारशींसह प्रस्ताव सादर केला होता.

# विधान परिषदेच्या ५ पैकी २ जागांचा निकाल जाहीर

* पुणे शिक्षक मतदारसंघातून भाजपचे कौस्तुभ गावडे विजयी

* छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघात प्रतापसिंग पाटील यांचा विजय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले असून, मतमोजणीला विलंब होत असल्याने राजकीय वतुर्ळातील उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. पाच मतदारसंघांपैकी दोन जागांचे निकाल जाहीर झाले असून, पुणे शिक्षक मतदारसंघातून भाजपचे कौस्तुभ गावडे यांनी विजय मिळवला आहे. तर छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रतापसिंग पाटील विजयी झाले आहेत.



पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे, शिवसेनेकडून पुरस्कृत अपक्ष उमेदवार सचिन सानप आणि काँग्रेसचे जयंत आसगावकर यांच्यात प्रमुख लढत झाली. या लढतीत गावडे यांनी बाजी मारत भाजपच्या विजयाची नोंद केली.

दुसरीकडे, छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघात प्रतापसिंग पाटील यांनी विजय मिळवत राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटाला यश मिळवून दिले. या निकालामुळे पदवीधर मतदारसंघातील राजकीय समीकरणांकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे.

तीन मतदारसंघांचे निकाल प्रतीक्षेत दरम्यान, पुणे पदवीधर, नागपूर पदवीधर आणि अमरावती शिक्षक मतदारसंघातील मतमोजणी सुरू असल्याची माहिती आहे. त्यामुळे या तीन मतदारसंघांतील अंतिम निकालांकडे राजकीय पक्षांसह उमेदवारांचे समर्थक आणि मतदारांचे लक्ष लागले आहे. नागपूर पदवीधर मतदारसंघात भाजपचे सुधाकर कोहळे आणि काँग्रेसचे विद्यमान आमदार अभिजीत वंजारी यांच्यात प्रमुख लढत होत आहे. या मतदारसंघातील निकालाचा भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांसाठी राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण परिणाम होऊ शकतो. पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपच्या स्मिता जाधव आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या हर्षदा जाधव यांच्यात सामना रंगला आहे. या मतदारसंघातील निकालाकडेही सर्वांचे लक्ष आहे.

### अमरावती शिक्षक मतदारसंघात चुरस

■ अमरावती शिक्षक मतदारसंघात किरण सरनाईक, अदिती पोहरे, संगीता शिंदे आणि दत्तात्रय लहाने यांच्यासह प्रमुख उमेदवारांमध्ये लढत होत आहे. शिक्षक मतदारांच्या मतदानातून कोणाला कौल मिळतो, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

# सरकारने शेतकऱ्यांसाठी नियम कडक केले

### ५ हजार रुपये देऊन चेष्टा, सुप्रिया सुळेंची सरकारवर टीका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - राज्यातील दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांच्या वाढत्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या मदतीवर प्रश्न उपस्थित करत त्यांनी इंदापूर तालुका पूर्णपणे दुष्काळग्रस्त असेल, तर शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी मागणी केली. सरकारकडून दिल्या जाणाऱ्या ५ हजार रुपयांच्या मदतीने शेतकऱ्यांच्या समस्या सुटणार आहेत का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

सुप्रिया सुळे सध्या पुरंदर तालुक्यातील राजुरी गावात दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान त्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधत



पाणीटंचाई, रोजगार हमी योजनेची रखडलेली कामे, कर्जमाफी आणि शेतकऱ्यांना मिळणाऱ्या आर्थिक मदतीचा आढावा घेतला.

५ हजार रुपयांनी काय होणार? सरकारने गरिबांची चेष्टा केली' दुष्काळाची परिस्थिती अत्यंत भयानक असल्याचे सांगत सुप्रिया सुळे म्हणाल्या की, गावागावांत परिस्थिती फारच भीषण आहे. लोकांमध्ये अस्वस्थता आहे. मोठ्या प्रमाणात नाराजी आहे. महाराष्ट्र सरकार ५००० रुपये देते असं म्हणते, सरकारकडून दिल्या जाणाऱ्या ५ हजार रुपयांच्या मदतीने नेमके काय साध्य होणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

सरकारने गरिबांची चेष्टा केल्याचं त्या म्हणाल्या. हे फार मी जड अंत:करणाने बोलते आहे. दुष्काळाच्या मुद्द्यावर आम्हाला राजकारण करायचे नाही, तर सरकारला सहकार्य करण्याची आमची भावना आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. दीड महिन्यांपूर्वी शरद पवार यांनी दुष्काळाचे नियोजन कशा पद्धतीने करावे, याबाबत मुख्यमंत्र्यांना दोन पत्र दिले होते. मात्र, सरकारकडून दुष्काळाचा सामना करण्यासाठी आवश्यक यंत्रणा कार्यरत असल्याचे दिसत नसल्याचा आरोप सुळे यांनी केला.

# जलसंपदा विभागात ३९,७२२ पदभरती : आकृतीबंध मंजूर

### वाढीव ११० सिंचन शाखा, भूसंपादन, कृषी, सिंचन सहाय्यकाचे नवे पद



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - जलसंपदा विभागासाठी वाढीव ११० सिंचन शाखांसह, ३९ हजार ७२२ पदांच्या आकृतीबंधास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. नदीजोड प्रकल्पासाठी मुख्य अभियंता (स्थापत्य) या पदासह, पाच महामंडळाकरिता भूसंपादन, कृषि, सामाजिक बदल तज्ज्ञांची कार्यकारी अभियंता दर्जाची १५ पदे, याशिवाय सिंचन सहाय्यक असे नवीन पद निर्माण करण्यास मंजुरी या बैठकीत देण्यात आली. नदीजोड प्रकल्प मुख्य अभियंता (स्थापत्य) यांचे पद थेट शासन नियंत्रणाखाली राहील. राज्यात २०१६ अखेरपर्यंत सिंचनाखाली असलेल्या ४५ लाख हेक्टर क्षेत्रामध्ये १३ लाख हेक्टरची वाढ झाली आहे. त्यामुळे २०२५ अखेरपर्यंत ५८ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे. या वाढीव क्षेत्राच्या व्यवस्थापनाकरिता वाढीव ११० सिंचन शाखांसह एकूण १ हजार ४५० सिंचन शाखा कार्यालयासाठी पदनिर्मितीस मान्यता देण्यात आली.

# उमेश पाटील राष्ट्रीय मुख्य प्रवक्तेपदी

### झिशान सिद्दीकी यांच्याकडे मुंबई अध्यक्षपदाची धुरा



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात महत्त्वाच्या संघटनात्मक नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. सोलापूर जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांची पक्षाच्या राष्ट्रीय मुख्य प्रवक्तेपदी, तर आमदार झिशान सिद्दीकी यांची मुंबई अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी बुधवारी, २८ ऑक्टोबर रोजी या नियुक्त्यांची घोषणा केली.

देवगिरी निवासस्थानी नियुक्तीपत्र प्रदान मुंबईतील देवगिरी या शासकीय निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात उमेश पाटील आणि झिशान सिद्दीकी यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि खासदार पार्थ अजित पवार उपस्थित होते. तसेच पक्षाचे अन्य नेते आणि पदाधिकारीही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# ऑनलाईन टास्कच्या आमिषाने मोर्शीतील युवकाला १४ लाखांचा गंडा!

### डाटा एन्ट्री व हॉटेल रेटिंगच्या नावाखाली फसवणूक : दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मोर्शी** - ऑनलाईन डाटा एन्ट्री करून पैसे कमावण्याचे आमिष दाखवून मोर्शी येथील एका युवकाची तब्बल १४ लाख ३ हजार रुपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी मोर्शी येथील दोघांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

कलश सुरेश शर्मा (रा.ज्ञानदीप कॉलनी, मोर्शी) असे फसवणूक झालेल्या युवकाचे नाव आहे. १२ ते २४ ऑक्टोबरदरम्यान ही घटना घडली. इंस्टाग्रामवर मेगा इंडिया लिमिटेड, मोर्शी या कंपनीच्या नावाने डाटा एन्ट्री करून पैसे कमावण्याची




जाहिरात त्याला दिसली. त्यानुसार त्याने जाहिरातीवर आपली वैयक्तिक माहिती भरली.

त्यानंतर संबंधितांकडून भारतीय हॉटेलला गुगल मॅपवर रेटिंग दिल्यास पैसे मिळतील, असे सांगण्यात आले. सुरुवातीला त्याला काही पैसेही देण्यात आले. त्यामुळे विश्वास बसल्याने त्याने पुढील टास्क पूर्ण केले; मात्र त्यानंतर त्याला पैसे मिळणे बंद झाले. वेगवेगळ्या आयडीवरून त्याने पैसे भरले. यामध्ये एकाच दिवशी दीड लाख रुपये भरल्याची माहिती आहे. दरम्यान, २५ ऑक्टोबर रोजी पैसे काढण्यासाठी (विड्रॉल) एकूण रकमेच्या ३० टक्के रक्कम भरण्याचे आमिष दाखविण्यात आले. मात्र, आपल्याकडे पैसे नसल्याचे कलशने सांगितल्यानंतर संबंधितांकडून टाळाटाळ करणारी उत्तरे देण्यात आली आणि त्याच्याशी संपर्क तोडण्यात आला.

या प्रकारात आपली एकूण १४ लाख ३ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाल्याची तक्रार कलश वर्मा याने पोलिसांत नोंदविली. त्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी मेगा इंडिया लिमिटेडशी संबंधित असल्याचे सांगितलेल्या यश लोलेकर (मोर्शी) आणि एका युवतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# हिवरखेड येथे ३२ वर्षीय युवकाची आत्महत्या!

### गळफास घेत जीवन संपविले : आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**हिवरखेड** - येथील गंगाबाई सीतारामजी चौधरी कन्या हायस्कूलचे माजी कर्मचारी विष्णू शामरावजी टाकळे यांचे सुपुत्र शुभम विष्णू टाकळे (वय ३२ वर्षे) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना २५ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे ९.३० वाजताच्या सुमारास घडल्याचे सांगण्यात येत आहे. या



घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

शुभम टाकळे हे इलेक्ट्रिकचे काम करीत होते. त्यांनी आत्महत्या करण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

या प्रकरणी पुढील तपास मोर्शी पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत.

शुभम यांच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ व सुन,एक बहीण, बाप्पु असा परिवार असून, त्यांच्या निधनाने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



# संत्रा-मोसंबीसाठी ठिबक सिंचन अर्जांना तात्काळ पुर्वसंमती द्या!

## किसान न्याय हक्क संघर्ष समितीचे स्वप्निल खांडेकर यांची मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – यंदा कमी पावसामुळे वरुड-मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. संत्रा व मोसंबी या फळिपकांना पुरेसे पाणी मिळणे आवश्यक असताना विहिरींच्या पाणीपातळीत मोठी घट झाली आहे. अशा परिस्थितीत कमी पाण्यात फळबागांना सिंचन करता यावे, यासाठी ठिबक सिंचनाची नितांत गरज आहे. मात्र, कृषी विभागाकडे अर्ज करुनही अद्याप पूर्वसंमती मिळाली नसल्याने शेतकऱ्यांची अडचण वाढली आहे. त्यामुळे ठिबक सिंचन योजनेतील सर्व प्रलंबित अर्जांना तात्काळ पूर्वसंमती देण्याची मागणी किसान न्याय हक्क संघर्ष समितीने केली आहे.

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शेतातील विहिरींची पाणीपातळी खालावली आहे. दिवसभर पाणी देणाऱ्या विहिरि आता अवघ्या एका तासात आटत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. संत्रा व मोसंबीच्या बागा वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना उपलब्ध पाण्याचे नियोजन करुन सिंचन करावे लागत आहे. ठिबक सिंचनाच्या माध्यमातून कमी पाण्यात झाडांना आवश्यक तेवढे पाणी देता येते. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत ठिबक सिंचन व्यवस्था उभारणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. या गंभीर परिस्थितीचा विचार करुन कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि प्रलंबित अर्जांना तातडीने पूर्वसंमती द्यावी, अशी मागणी किसान न्याय हक्क संघर्ष समितीचे अध्यक्ष स्वप्निल खांडेकर यांनी जिल्हा कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शेतकऱ्यांच्या फळबागा वाचविण्यासाठी वेळेत सिंचनाची व्यवस्था होणे आवश्यक आहे. त्यामुळे कृषी विभागाने या मागणीची तातडीने दखल घेऊन सर्व पात्र अर्जांना पूर्वसंमती द्यावी आणि शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचे काम सुरु करण्यासाठी सहकार्य करावे, अशी विनंती समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

# राज्यात २३ जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित : 35 हजार मेगावॉट क्षमतेचे प्रकल्प

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – कर्जत येथील टोरंट प्रकल्पासाठीच्या वृक्षतोडीला जोरदार विरोध होत असताना राज्यात जवळपास ३५ हजार मेगावॉट क्षमतेचे एकूण २३ उपसा जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहेत. या प्रकल्पांना अंतिम मान्यता मिळाल्यास नजीकच्या काळात पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होण्याची भीती व्यक्त होत आहे. पुण्यातील माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी मंगळवारी 'एक्स' या समाजमाध्यमातून राज्यात प्रास्तवित असलेल्या २३ जलविद्युत प्रकल्पांची यादी प्रसिद्ध केली. हे प्रकल्प रायगड, पुणे, सातारा, सिंधुदुर्ग, संभाजीनगर, कोल्हापूर या जिल्ह्यात होऊ घातले आहेत.

# येरला येथे एक लाखांहून अधिक किमतीची मिरची पावडर जप्त

## अन्नसुरक्षा विभागाची कारवाई : ४८५ किलो साठा ताब्यात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मोर्शी** – तालुक्यातील येरला येथे मिरची पावडरचे उत्पादन करुन तिची खुल्या स्वरुपात विक्री केली जात असल्याचे आढळून आल्याने अन्नसुरक्षा विभागाने कारवाई केली. या कारवाईत तपासणीसाठी मिरची पावडरचे नमुने घेण्यात आले असून, उर्वरित ४८५ किलो साठा जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या साठ्याची किंमत १ लाख ९ हजार १२५ रुपये आहे.

प्राप्त माहितीनुसार, मंगळवारी अन्नसुरक्षा अधिकारी घनश्याम दंदे यांनी येरला येथील पंकज शामराव कावळे यांच्या उत्पादनगृहाची पाहणी केली. यावेळी मिरची पावडरचे उत्पादन करुन तिची खुल्या स्वरुपात विक्री केली जात असल्याचे निदर्शनास आले. अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक आणि विक्री करताना अन्नसुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांनी मिरची पावडरचे नमुने तपासणीसाठी घेतले. तसेच उत्पादनगृहात उपलब्ध असलेला ४८५ किलो मिरची पावडरचा साठा जप्त केला. या साठ्याचे बाजारमूल्य १ लाख ९ हजार १२५ रुपये असल्याची माहिती अन्नसुरक्षा विभागाने दिली. ही कारवाई अन्नसुरक्षा अधिकारी घनश्याम दंदे यांनी केली.

## कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून अभिमन्यु युवक दुर्गा मंडळातर्फे

# विविध खेळ स्पर्धांचे बक्षीस वितरण संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – दुर्गा उत्सवानिमित्त अभिमन्यु युवक दुर्गा मंडळ यांच्यातर्फे आयोजित मुला-मुलींच्या विविध खेळ स्पर्धांचे बक्षीस वितरण कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून नुकतेच उत्साहात पार पडले.

डॉ.अरविंद बडघरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला जितेंद्र शेटीये, डॉ.रेखा बडघरे, रवी कपिले, हर्षल गणोरकर, जया आगरकर, मंगला गणोरकर, पूनम शेटीये, शुभांगी आगरकर व अनुप आगरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धांमध्ये ग्लास स्पर्धा, संगीत खुर्ची, रस्सी कुद आणि बकेट बॉल अशा विविध खेळांचा समावेश होता. ग्लास स्पर्धेत मुलांमधून यज्ञेश नागमोते प्रथम तर वीरु आगरकर याने द्वितीय क्रमांक पटकावला. मुलींमध्ये राजश्री आगरकर व देवांशी काळे प्रथम तर भाविका धुर्वे व खुशी इंगळे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. संगीत खुर्ची स्पर्धेत मुलांमधून स्वरुप आगरकर प्रथम, यज्ञेश नागमोते द्वितीय आणि वीरु आगरकर तृतीय ठरला. मुलींमध्ये राजश्री आगरकर हिने प्रथम, ओजस्वी आगरकर हिने द्वितीय, तर आरोही आगरकर हिने तृतीय क्रमांक मिळविला. रस्सी कुद स्पर्धेत राजश्री आगरकर प्रथम, धनश्री शेटीये द्वतीय, भाविका धुर्वे तृतीय तर ओजस्वी आगरकर हिने चतुर्थ क्रमांक पटकावला. बकेट बॉल स्पर्धेत मयंक कपिले व स्वरुप आगरकर प्रथम तर विधी कपिले व वीरु आगरकर यांनी द्वितीय क्रमांक मिळिवला. सर्व विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते विविध बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला अभिमन्यु युवक दुर्गा मंडळाचे सर्व सदस्य तसेच मंगला होले, लता शेटीये, रुपा उईके, आरती ठाकरे, भावना गणोरकर, माधुरी आगरकर, देवलबाई, अंजली आगरकर व बेबी धुर्वे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन व आभार जितेंद्र शेटीये यांनी मानले.

## विश्वमानव रुहानी केंद्र, नवानगर मिशन यांच्या वतीने

# जि.प.शाळेतील २१८ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**हिवरखेड** – विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण व्हाव्यात, या उद्देशाने विश्वमानव रुहानी केंद्र, नवानगर मिशन यांच्या वतीने हिवरखेड येथील जिल्हा परिषद प्राथमिक मुलींच्या व मुलांच्या शाळेतील एकूण २१८ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले असून, परिसरात या सामाजिक उपक्रमाचे कौतुक होत आहे.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना रजिस्टर बुक, कंपास, पाणी बॉटल,रंगीत कांड्या, पेन, खोडरबर, पट्टी (स्केल) तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शालेय साहित्य उपलब्ध करून देऊन त्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचा हा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे.

या कार्यक्रमाला जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका कांता माटे, जिल्हा परिषद प्राथमिक मुलांच्या शाळेच्या मुख्याध्यापिका लतिका भोजने, अतुल डाखोरे,राजु बानाईत, महेंद्र पेठे, बाबुराव,थोटे, दिनेश कळमकर, सीताराम दोडके आदी उपस्थित होते.

शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा पाया आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य मिळाल्यास त्यांना अभ्यासासाठी प्रोत्साहन मिळते. विश्वमानव रुहानी केंद्र, नवानगर मिशन यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले आहे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुललेले हास्य आणि शिक्षणासाठी मिळालेली प्रेरणा हीच या उपक्रमाची खरी फलश्रुती ठरली आहे.

# राज्य सरकार इस्टेट एजंट झाले आहे का?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**ठाणे** – ठाण्यातील फ्लेमिंगो अभयारण्य बिल्डरच्या घशात घालण्याचा डाव आखण्यात आला आहे. एका खासगी बिल्डरने ठाणे- मुंबईच्या वेशीवरील भूखंड मागितल्याने वनविभागाने १४३ एकर फ्लेमिंगो अभयारण्याची जागा संवेदनशील क्षेत्रातून वगळण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. बिल्डरच्या फायद्यासाठी कांदळवनांची कत्तल करून फ्लेमिंगोंचा नैसर्गिक अधिवासात घुसखोरीची परवानगी देणारे हे सरकार इस्टेट एजंट झाले आहे, अशी टीका करून राष्ट्रवादी काँग्रेस (शप) राष्ट्रीय सरचिटणीस डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी कांदळवन बचाओ मोहीम राबविणार असल्याची माहिती दिली. दरम्यान, संरक्षित कांदळवन बिल्डरला देण्याच्या उद्देशानेच ठाणे विभागाचे उपवनसंरक्षक , कांदळवन कक्षाचे उपवनसंरक्षकांनी या प्रस्तावाला 'ना हरकत'प्रमाणपत्र दिल्याने यात मोठा भ्रष्टाचार झाल्याचे दिसत आहे. अशी मागणी जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांनी केली आहे.

# अर्णवमुळे पावसासाठी अनुकूल वातावरण : कोकण किनारपट्टीवर हलक्या सरींचा अंदाज

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे 'अर्णव' चक्रीवादळ आकार घेत असून, या हवामान प्रणालीच्या प्रभावातून २७ ते २९ ऑक्टोबर दरम्यान महाराष्ट्रातील विविध भागांत मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. महाराष्ट्रातील हवामानाचा विचार करता, पुढील दोन दिवस हवामान मुख्यत्वे कोरडे राहण्याचा अंदाज असला तरी २७ ऑक्टोबरपासून राज्यात पावसासाठी अनुकूल वातावरण तयार होईल. याच काळात कोकण किनारपट्टीवरही हलक्या पावसाच्या सरींची शक्यता आहे. २९ ऑक्टोबर रोजीही पावसाचा प्रभाव कायम राहणार असून रत्नागिरी, नाशिक घाट, पुणे घाट, सातारा घाट, जालना, भंडारा, गडचिरोली आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

पूर्व विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यासाठी २७ ऑक्टोबर रोजी हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला असून तेथे ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे. त्यानंतर २८ ऑक्टोबर रोजी राज्यात पावसाचा जोर अधिक वाढेल.

## बी.ए.जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागाच्या विद्यार्थ्यांचा

# जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेत प्रथम क्रमांक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – पत्रकारितेच्या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स येथील बी.ए.जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेत पदवीस्तरीय व ह्युमॅनिटीज लँग्वेज अँड फाइन आर्ट्स या गटातून प्रथम क्रमांक पटकाविला.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती सत्र २०२६-२७ अंतर्गत सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी अमरावती येथे आयोजित या स्पर्धेत पदवीस्तरीय गट आणि ह्युमॅनिटीज अँड फाइन आर्ट्स या प्रकारात विद्यार्थ्यांनी 'एआय मोजो किट- स्मार्ट मोबाईल जर्नालिझम आणि इन्स्टंट लाईव्ह ब्रॉडकास्टिंग किट' या नाविन्यपूर्ण मॉडेलचे प्रभावी सादरीकरण केले. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये वृत्तांकन करताना ग्रामीण व दुर्गम भागांमध्ये तसेच आपत्कालीन परिस्थितीत मोठे कॅमेरे आणि अन्य उपकरणे घेऊन जाणे अनेकदा कठीण होते. अशा वेळी स्मार्ट मोबाईल जर्नालिझम किटच्या माध्यमातून कमी खर्चात वृत्तांकन आणि थेट प्रक्षेपण करणे शक्य व्हावे, या उद्देशाने हे मॉडिल अत्यंत उपयोगी आणि महत्वाचे ठरते.

आधुनिक पत्रकारितेसाठी उपयुक्त ठरणाऱ्या या ऑल-इन-वन आणि बजेट-फ्रेंडली किटचे विद्यार्थ्यांनी परीक्षकांसमोर प्रात्यक्षिकासह उत्कृष्ट सादरीकरण केले. या मॉडेलला हुमानिटी अँड फाईड आर्ट गटातून प्रथम क्रमांक मिळाला.

या मॉडेलची निर्मिती आणि सादरीकरण चिन्मई सुफले व किरण कवटकर या विद्यार्थ्यांनी केले. महाविद्यालयाच्या प्रा.साक्षी राठी यांनी समन्वयक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती, सर्जनशीलता आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी प्राचार्य डॉ.प्राची ठाकरे यांनी विशेष मार्गदर्शन केले. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि संशोधनात्मक कार्याला नवी दिशा मिळाली असून, या मॉडेलचे पुढील टप्प्यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठस्तरीय अविष्कार स्पर्धेत सादरीकरण केले जाणार आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल प्राचार्य डॉ.प्राची ठाकरे, बीएजेएमसी विभागप्रमुख प्रा.राहुल शिवारे, प्रा.राजकुमार वानखडे आणि प्रा.कविता बेहेरे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून विद्यापीठस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला तंत्रज्ञानाची जोड आणि पत्रकारितेला नव्या दिशेची साथ, हेच या यशाचे वैशिष्ट्य ठरले.

# संपादकीय

**नाती पैशाने नाही, तर प्रेमाने, विश्वासाने आणि आदराने टिकतात.**

## लोकशाहीचा उत्सव मोठा : जनतेचे प्रश्न मात्र अनुत्तरित!

सत्ता मिळिवण्यासाठी आश्वासनांची खैरात, विकासाच्या नावाने घोषणांचा पाऊस आणि प्रत्यक्षात मूलभूत प्रश्नांसाठी जनतेची सुरू असलेली धडपड, ही लोकशाहीसमोरील गंभीर विसंगती आहे. लोकशाहीचे खरे यश निवडणुकांच्या जल्लोषात नसून सामान्य माणसाच्या जीवनात घडणाऱ्या सकारात्मक बदलांत आहे. लोकशाही म्हणजे केवळ मतदानाचा अधिकार नव्हे, तर जनतेच्या अपेक्षांना न्याय देणारी शासनव्यवस्था. निवडणुका आल्या की राजकीय वातावरण तापते. सभांचा धुरळा उडतो, प्रचारफेऱ्यांनी रस्ते गजबजतात, आश्वासनांची बरसात होते आणि विकासाची स्वप्ने जनतेसमोर मांडली जातात. सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे वचन दिले जाते. मात्र, निवडणुकांचा उत्सव संपल्यानंतर याच आश्वासनांचे काय होते, हा प्रश्न आज लोकशाहीच्या गाभ्याशी जाऊन भिडतो. लोकशाहीचा खरा कस निवडणुकीतील विजयाने लागत नाही, तर सत्तेवर आल्यानंतर जनतेसाठी केलेल्या कामातून लागतो. आश्वासनांच्या राजकारणाला उत्तरदायित्वाची जोड हवी! भारतीय लोकशाहीची ताकद ही जनतेच्या सार्वभौम अधिकारात आहे. मतदार आपल्या मतातून सत्ताधाऱ्यांना निवडतो आणि त्याच अधिकारातून त्यांना सत्तेतून दूरही करू शकतो. ही व्यवस्था जनतेला केवळ शासन निवडण्याचा अधिकार देत नाही, तर शासनाच्या कामाचा हिशेब मागण्याची ताकदही देते. दुर्दैवाने, अनेकदा राजकारणात जनतेच्या प्रश्नांपेक्षा सत्तेची समीकरणे, पक्षीय संघर्ष, आरोप-प्रत्यारोप आणि राजकीय प्रतिष्ठेच्या लढाया अधिक महत्त्वाच्या ठरताना दिसतात. अशा वेळी लोकशाहीचा मूलभूत उद्देशच मागे पडण्याची भीती निर्माण होते. निवडणुकीच्या काळात रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, रोजगार, शेतमालाला योग्य भाव आणि महिलांची सुरक्षितता अशा विषयांना अग्रक्रम दिला जातो. प्रत्येक प्रश्न सोडविण्याची हमी दिली जाते. मात्र, सत्ता प्राप्त झाल्यानंतर अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी नागरिकांना कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. निवेदने दिली जातात, आंदोलने होतात, पाठपुरावा केला जातो; तरीही काही प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. मग प्रश्न उपस्थित होतो की, निवडणुकीपूर्वी जनतेच्या समस्या इतक्या महत्त्वाच्या असतात, तर निवडणुकीनंतर त्या दुय्यम का ठरतात? लोकप्रतिनिधींची जबाबदारी केवळ विकासकामांचे भूमिपूजन करणे किंवा पूर्ण झालेल्या कामांचे उद्घाटन करण्यापुरती मर्यादित असू शकत नाही. त्यांनी जनतेच्या प्रश्नांना वेळेत प्रतिसाद देणे, प्रशासनाला कार्यक्षम बनविणे आणि सार्वजनिक निधीचा योग्य विनियोग होतो आहे की नाही, याची खात्री करणे आवश्यक आहे.




# ‘शिक्षक’ निवडणूकीची मतमोजणी



भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते. ही लोकशाही केवळ संविधानावर आधारित नसून ती निवडणुकांच्या प्रक्रियेद्वारे जिवंत ठेवली जाते. लोकशाही म्हणजे केवळ मतदान करणे नव्हे, तर ती एक जीवनपद्धती आणि शासनप्रणाली आहे. अब्राहम लिंकन यांच्या शब्दात सांगायचे तर, ‘लोकांनी, लोकांच्या हितासाठी, चालवलेले लोकांचे राज्य म्हणजे लोकशाही.‘ या लोकशाहीचा एक भाग म्हणून महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाची निवडणुक आता अंतिम टप्प्यात आली आहे. अमरावती विभागातील ५ जिल्ह्यातील ८१ मतदान केंद्रावर शुक्रवारी २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या कालावधीत मतदान प्रक्रिया पार पडली. विभागातील एकूण ३३ हजार ३४ मतदारांनी म्हणजेच ९२.२५ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. आता मंगळवारी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी अमरावती येथील लोकशाही भवनात मतमोजणीची प्रक्रीया होणार आहे. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून २६ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. शिक्षक मतदारसंघाची निवडणूक यंत्रणा मतमोजणीसाठी सज्ज झाली आहे. या पार्श्वभूमीवर ही निवडणूक नेमकी कशी असते, मतमोजणीची प्रक्रिया कशी राबवली जाते हे समजून घेणे महत्वाचे आणि तेवढेच रंजक सुध्दा आहे.

मतपेट्या स्ट्राँगरूममधून बाहेर आणून त्या-त्या टेबलवर सील उघडून रितसर मतपत्रिकांचे गठ्ठे बनवले जातात. मतमोजणी अधिकाऱ्यांकडून वैधतेसंबंधित शंकास्पद/संदिग्ध मतपत्रिका अंतिम निर्णयाकरीता सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केले जातात. याप्रमाणे वैध मतपत्रिकांचे पसंतीक्रमानूसार आवश्यक गठ्ठे बनवले जातात.

प्रत्यक्ष आकड्यांसह मतमोजणी कशी होते, हे आपण एका सोप्या काल्पनिक उदाहरणाद्वारे समजावून घेऊया. समजा, एका शिक्षक मतदारसंघात मतदानामध्ये एकूण १०,००० वैध मते पडली आहेत आणि निवडणुकीच्या रिंगणात ४ उमेदवार उभे आहेत (अ, ब, क आणि ड).

पायरी १: विजयासाठीचा कोटा ठरवणे. शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत जिंकण्यासाठी किती मते (कोटा) लागतात, हे काढण्यासाठी झालेल्या मतदानातील एकूण वैध मतांना २ ने भागणे आणि त्यात १ मिळवणे. हे सुत्र कोटा निश्चित करण्यासाठी वापरले जाते. याचा अर्थ, वरील उदाहरणात ज्या उमेदवाराला विजयाची माळ गळ्यात पडायची असेल, त्याला किमान ५,००१ मते मिळवणे बंधनकारक ठरते. हा कोटा निश्चित केला जातो.

पायरी २: पहिली फेरी - पहिल्या पसंतीची मते मोजणे. पहिल्या फेरीत फक्त आणि फक्त 'पसंती क्रमांक १'ची मते मोजली जातात. समजा, पहिल्या फेरीत सर्व उमेदवारांना मिळालेली मते अशी आहेत:

उमेदवार ‘अ’ : ४,००० मते
उमेदवार ‘ब’ : ३,००० मते
उमेदवार ‘क’ : २,००० मते
उमेदवार ‘ड’ : १,००० मते
एकूण वैध मते : १०,०००

निकालाचे विश्लेषण : विजयासाठी ५,००१ मते हवी आहेत; पण पहिल्या फेरीत सर्वाधिक ४,००० मते मिळवूनही ‘अ’ उमेदवार ५,००१ च्या कोट्यापर्यंत पोहोचू शकलेला नाही. त्यामुळे पहिल्या फेरीत कोणीही विजयी ठरत नाही. आता दुसरी फेरी सुरू होते.

पायरी ३: दुसरी फेरी - सर्वात कमी मते असलेल्या उमेदवाराला बाद ठरवणे दुसऱ्या फेरीत ज्या उमेदवाराला सर्वात कमी ‘पसंती क्रमांक १’ ची मते मिळाली आहेत, त्याला शर्यतीतून बाहेर केले जाते. इथे उमेदवार ‘ड’ याला सर्वात कमी म्हणजेच १,००० मते मिळाली आहेत. त्यामुळे ‘ड’ बाद केला जातो. जर एकापेक्षा जास्त उमेदवारांना समसमान कमी मते मिळाली असतील तर पुढील लगतच्या फेरीत कमी मते पडली असतील त्या उमेदवाराला बाद करण्यात येते. आता ‘ड’ ला मिळालेल्या त्या १,००० मतपत्रिका तपासून पाहिल्या जातात की, त्या मतदारांनी ‘पसंती क्रमांक २’ कोणाला दिला आहे ? समजा, ‘ड’ च्या त्या १,००० मतपत्रिकांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे झाले: त्यातील ६०० मतदारांनी त्यांच्या पसंतीक्रमात दुसरा क्रमांक ‘अ’ ला दिला होता. त्यातील ३०० मतदारांनी दुसरा क्रमांक ‘ब’ ला दिला होताउरलेल्या १०० मतपत्रिकांवर दुसरा पसंतीक्रम नव्हता किंवा तो अवैध ठरला. आता ही मते संबंधित उमेदवारांच्या खात्यात जोडली जातात:उमेदवार ‘अ’: ४,००० + ६०० (नवीन मते) = ४,६०० मते

उमेदवार ‘ब’: ३,००० + ३०० (नवीन मते) = ३,३०० मते

उमेदवार ‘क’: २,००० मते (जैसे थे)

स्थिती: अजूनही कोणालाही ५,००१ चा कोटा मिळालेला नाही (‘अ’ कडे ४,६०० मते आहेत). त्यामुळे मोजणी तिसऱ्या फेरीत जाते.

पायरी ४ : तिसरी फेरी-अतिशय महत्त्वाची फेरी तिसऱ्या फेरीत आता उरलेल्या उमेदवारांपैकी ज्याला सर्वात कमी मते आहेत, त्याला बाहेर काढले जाईल. आता उमेदवार ‘क’ कडे सर्वात कमी २,००० मते आहेत, त्यामुळे ‘क’ ला शर्यतीतून बाहेर केले जाते. आता ‘क’ च्या त्या २,००० मतपत्रिका तपासल्या जातात आणि पाहिलं जातं की, त्यांच्यावर पुढचा पसंतीक्रम (उदा : दुसरा किंवा तिसरा) कोणाचा आहे. समजा, ‘क’ च्या त्या २,००० मतांपैकी: १,२०० मतांमध्ये पुढची पसंती ‘अ’ कडे गेलेली आढळली. ५०० मतांमध्ये पुढची पसंती ‘ब’ कडे गेलेली आढळली. ३०० मते दुसऱ्या कोणालाच पसंती न दिल्याने बाद झाली. आता ही मते ‘अ’ आणि ’ब’ च्या खात्यात जमा होतात: उमेदवार ‘अ’: ४,६०० + १,२०० = ५,८०० मते उमेदवार ‘ब’: ३,३०० + ५०० = ३,८०० मते अंतिम निकाल: आवश्यक असलेला ५,००१ चा कोटा ‘अ’ ने पार केला आहे! परिणामी, उमेदवार ‘अ’ ला विजयी घोषित केले जाते. या आकडेवारीवरून काय स्पष्ट होते? पहिल्या फेरीत ‘अ’ कडे फक्त ४,००० मते होती आणि ‘ब’ कडे ३,०००, तरीही पसंतीक्रमाच्या मतदानामुळे आणि मते हस्तांतरीत झाल्यामुळे ‘अ’ चा विजय सुकर झाला. शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत म्हणूनच प्रत्येक पसंतीचा (१, २, ३...) कागद आणि मत अत्यंत महत्त्वाचे ठरते. हे विशेष. एखादा उमेदवार पहिल्या पसंतीचा मतांचा कोटा पूर्ण करू न शकल्यास जेवढी पसंतीक्रमाची मते असतात तेवढी सारी मते मोजावी लागतात. तेवढे करूनही उमेदवाराला मतांचा कोटा पूर्ण करता आला नाही तर सर्व मतांची मोजणी होऊन सर्वाधिक मते मिळालेला उमेदवार विजयी घोषित केला जातो. ही मतमोजणीची प्रक्रीया अधिक वेळ लागणारी आणि तेवढीच सर्वांची उत्कंठा शिगेला पोहोचवणारी आहे. परिस्थितीनूसार यामुळे मतमोजणी प्रक्रीयेला बराच वेळ लागू शकतो. यात शंकाच नाही.

**अनिल आलुरकर**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, अमरावती

# लोकशाहीचा उत्सव मोठा; जनतेचे प्रश्न मात्र अनुत्तरित!



राजकीय आश्वासनांचा गाजावाजा, विकासाच्या दाव्यांची आतषबाजी; मात्र सामान्य माणसाच्या प्रश्नांना न्याय कधी?

लोकशाही हा केवळ निवडणुकांचा उत्सव नाही, तर जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याची आणि सत्तेला उत्तरदायी धरण्याची एक प्रभावी व्यवस्था आहे. निवडणुका जवळ आल्या की राजकीय वातावरण तापते. सभा, रॅली, प्रचारफेऱ्या आणि आश्वासनांचा पाऊस सुरू होतो. विकासाची स्वप्ने दाखविली जातात, नव्या योजनांची घोषणा केली जाते आणि सामान्य जनतेच्या समस्या सोडविण्याची ग्वाही दिली जाते. मात्र, निवडणुकीचा धुरळा खाली बसल्यानंतर याच आश्वासनांचे काय होते, हा प्रश्न आजही अनुत्तरित राहतो. लोकशाहीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असताना जनतेचे मूलभूत प्रश्न मात्र वर्षानुवर्षे कायम राहत असतील, तर या व्यवस्थेच्या कार्यपद्धतीचे आत्मपरीक्षण होणे आवश्यक आहे.

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही व्यवस्थांपैकी एक आहे. या व्यवस्थेचा पाया जनतेच्या विश्वासावर उभा आहे. मतदार आपल्या मतातून लोकप्रतिनिधी निवडतो, त्यांच्यावर विश्वास ठेवतो आणि आपल्या परिसराच्या, राज्याच्या तसेच देशाच्या विकासाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवितो. त्यामुळे सत्तेवर येणाऱ्या प्रत्येक लोकप्रतिनिधीने जनतेच्या अपेक्षांना प्राधान्य देणे अपेक्षित आहे. सत्ता म्हणजे अधिकारांचा उपभोग नव्हे, तर जनतेच्या विश्वासाची जबाबदारी होय. ही जाणीव राजकीय व्यवस्थेच्या केंद्रस्थानी राहिली, तरच लोकशाही अधिक बळकट होऊ शकते.

आश्वासनांचे काय होते? निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यांमध्ये रोजगारनिर्मिती, शेतकऱ्यांचे उत्पन्न, शिक्षण, आरोग्य, महिला सुरक्षा, महागाई नियंत्रण आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला महत्त्व दिले जाते. नागरिकांनाही या आश्वासनांमधून आपल्या जीवनात बदल घडण्याची अपेक्षा असते. परंतु अनेकदा आश्वासनांची पूर्तता कितपत झाली, कोणत्या योजना अपूर्ण राहिल्या आणि त्यामागील कारणे काय आहेत, याचा सार्वजनिक पातळीवर पुरेसा हिशेब दिसत नाही.

जाहीरनामा हा केवळ निवडणुकीतील विजय मिळिवण्याचे साधन नसावे. तो जनतेसमोर मांडलेला विकासाचा आराखडा असावा. सत्तेवर आल्यानंतर त्यातील आश्वासनांवर किती काम झाले, किती काम प्रगतीपथावर आहे आणि कोणत्या बाबींमध्ये अडचणी आहेत, याची माहिती नागरिकांना नियमितपणे मिळाली पाहिजे. आर्थिक किंवा प्रशासकीय कारणांमुळे एखादे आश्वासन पूर्ण होऊ शकत नसेल, तर त्यामागील वास्तव स्पष्टपणे सांगण्याची जबाबदारीही सत्ताधाऱ्यांचीच आहे.

जनतेला केवळ आश्वासनांची पुनरावृत्ती नको आहे; तिला कामाचा ठोस परिणाम हवा आहे. घोषणांच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष कृती करण्याची राजकीय इच्छाशक्ती असेल, तरच लोकांचा विश्वास टिकून राहू शकतो.

विकासाच्या दाव्यांची कसोटी जमिनीवर! आज विकासाच्या नावाखाली अनेक मोठे प्रकल्प, आधुनिक सुविधा आणि विविध सरकारी योजनांची चर्चा केली जाते. रस्ते, पूल, औद्योगिक प्रकल्प, डिजिटल सेवा आणि नागरी सुविधांचा विस्तार हे निश्चितच विकासाचे महत्त्वाचे घटक आहेत. परंतु विकासाचे मूल्यमापन केवळ प्रकल्पांच्या संख्येवर, खर्चाच्या आकड्यांवर किंवा जाहिरातींमधील दाव्यांवर करता येणार नाही. त्या विकासाचा सामान्य नागरिकाला किती लाभ झाला, हे अधिक महत्त्वाचे आहे.

एखाद्या गावात पिण्याच्या पाण्याची समस्या कायम असेल, शेतकऱ्याला सिंचनासाठी संघर्ष करावा लागत असेल, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासाठी दूर जावे लागत असेल किंवा रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसतील, तर विकासाच्या दाव्यांचा फेरविचार करणे आवश्यक ठरते. शहरांमध्ये आधुनिक सुविधा निर्माण होत असताना ग्रामीण भागातील मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होता कामा नये.

विकास म्हणजे केवळ बांधकाम नव्हे; तर त्या सुविधांचा दीर्घकाळ टिकणारा आणि सर्वसामान्यांना उपयोगी पडणारा परिणाम होय. एखाद्या योजनेसाठी निधी मंजूर झाला, याचा अर्थ तिचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचला असे होत नाही. म्हणूनच सार्वजनिक निधीचा विनियोग, कामांची गुणवत्ता, योजनांची अंमलबजावणी आणि लाभार्थ्यांची वास्तविक परिस्थिती यांची पारदर्शक तपासणी झाली पाहिजे.

सामान्य माणसाचे प्रश्न कोण सोडविणार? महागाई, बेरोजगारी, शेतीतील अनिश्चितता आणि शिक्षण-आरोग्याचा वाढता खर्च या समस्या सामान्य कुटुंबाच्या आर्थिक नियोजनावर परिणाम करतात. तरुणांच्या हाताला काम मिळणे, शेतमालाला योग्य भाव मिळणे, कुटुंबाला परवडणाऱ्या दरात आरोग्यसेवा मिळणे आणि मुलांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळणे या अपेक्षा अवास्तव नाहीत. त्या नागरिकांच्या मूलभूत गरजांशी संबंधित आहेत.

शेतकरी निसर्गाच्या लहरीपणाशी झुंज देतो, उत्पादन खर्च वाढल्याने आर्थिक गणित जुळिवण्याचा प्रयत्न करतो आणि बाजारभावातील चढ-उतारांमुळे अडचणीत येतो. दुसरीकडे, शिक्षण पूर्ण करूनही रोजगारासाठी संघर्ष करणारा तरुण भविष्याबद्दल चिंतित असतो. सामान्य नोकरदार आणि छोटे व्यावसायिक वाढत्या खर्चाचा ताळमेळ साधताना कसरत करतात. अशा परिस्थितीत विकासाचे मूल्यमापन करताना या घटकांच्या जीवनमानात किती सुधारणा झाली, याचा विचार केला पाहिजे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

## सरस्वताबाई खापरे यांचे निधन



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील सावंगा येथील श्रीमती सरस्वतीबाई बाबुरावजी खापरे यांचे वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर पार्थिववार आज सावंगा येथे आप्तेष्ट, स्वकीय आणि ग्रामवासियांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. त्या रामहरी खापरे यांच्या मातोश्री होत.

# जरुड येथे दुर्गा विसर्जन शांततेत २२ दुर्गा मंडळांचा सहभागः १० दिवस भक्तिमय वातावरण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जरुड** – येथे सालाबादप्रमाणे यंदाही नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. दहा दिवस चाललेल्या या उत्सवादरम्यान गावातील विविध दुर्गा उत्सव मंडळांच्या वतीने सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे संपूर्ण गावासह परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. नवरात्रोत्सवाच्या समारोपानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.



त्यानंतर सोमवार, २६ ऑक्टोबर रोजी दुर्गामूर्तींची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. यंदा जरुड गावातील एकूण २२ दुर्गा उत्सव मंडळांनी उत्सवात सहभाग घेतला होता. सर्व मंडळांच्या दुर्गामूर्तींचे शेकदरी तलाव प्रकल्प येथे विसर्जन करण्यात आले. उत्सव व विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. दुर्गा विसर्जन शांततेत पार पडावे, यासाठी पोलिस प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली होती. यावेळी अपर पोलीस अधीक्षक अमरावती दत्ता तोटेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील, ठाणेदार दिनेश चव्हाण, जरुड बीट जमादार विनोद बाबुलकर, पोलीस कर्मचारी मिनेश खडेकर, निलेश भुयार व इतर सहकाऱ्यांनी विशेष लक्ष ठेवले. पोलीस प्रशासनाच्या योग्य नियोजनामुळे जरुड येथील दुर्गा विसर्जन शांततेत व निर्विघ्नपणे पार पडले.

## पालिका अभियंत्यांच्या ऑनलाइन बदल्यांचा उतारा! महिनाभरात बदलीच्या ठिकाणी रूजू व्हा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबई महापालिकेतील अभियंत्यांच्या बदल्यांमध्ये होणारे कथित गैरव्यवहार आणि राजकीय हस्तक्षेपाला आळा घालण्यासाठी प्रशासनाने ऑनलाइन बदली प्रक्रिया राबविण्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. स्थापत्य आणि अभियांत्रिकी विभागातील सुमारे ८५० अभियंत्यांच्या बदल्या संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येणार आहेत.तसेच संबंधित विभागातील एचओडीने बदलीचे आदेश दिले नाही तर अधिकारी व विभागप्रमुखांचाही महिन्याचा पगार रोखणार, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे.

# बीएजेएमसीच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन

## करिअरच्या विविध संधींची माहिती : रोहन पांडे यांनी केले मार्गदर्शन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची माहिती मिळावी, परीक्षांच्या माध्यमातून करिअरच्या विविध संधी उपलब्ध व्हाव्यात आणि भविष्यातील वाटचालीचे योग्य नियोजन करता यावे, या उद्देशाने स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स येथील बीएजेएमसी विभागातर्फे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.प्राची ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा पार पडली.



कार्यशाळेत मार्गदर्शक रोहन पांडे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे स्वरुप, विविध परीक्षांचे प्रकार, तयारीची पद्धत, अभ्यासाचे नियोजन आणि यश मिळविण्यासाठी आवश्यक बाबींविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन, नियमित वाचन आणि चालू घडामोडींचे ज्ञान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

स्पर्धा परीक्षांची तयारी करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन आणि परीक्षेच्या तयारीसंदर्भात सहकार्य करण्याचे आश्वासनही रोहन पांडे यांनी दिले. पत्रकारिता व जनसंवादाचे शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांचाही विचार करुन करिअरच्या पर्यायांचा शोध घ्यावा, असे आवाहन या कार्यशाळेतून करण्यात आले.

यावेळी बीएजेएमसी विभागप्रमुख प्रा.राहुल शिवारे, प्रा.राजकुमार वानखेडे आणि प्रा.कविता बेहरे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांविषयी जागरुक करुन त्यांच्या उज्वल भविष्यासाठी योग्य दिशा देण्याच्या दृष्टीने विभागाचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

## शासनाच्या आरोग्य विभागातर्फे

# जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शासनाच्या आरोग्य विभागातर्फे आज जंतनाशक गोळी मोहिम राबविण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्र राजुरा बाजारच्या आरोग्य सेविकांनी शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छतेबाबत माहिती देत जंतनाशक गोळ्यांचे वितरण करण्यात आले.



जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी व उर्दू शाळेतील इयत्ता पहिली ते आठवीच्या ११० विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्र राजुरा बाजार अंतर्गत उपकेंद्र हातुर्णा येथील आरोग्य सेविका भारती पकडे, आरोग्य सेवक प्रज्वल खेडकर तथा आशा स्वयंसेविका अनिता डोंगरदिवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जेवणापूर्वी व शौचानंतर हात कसे स्वच्छ धुवावे? याचे प्रात्यक्षिक आरोग्य सेविका भारती पकडे यांनी विद्यार्थ्यांना करून दाखविले.यावेळी जंतामुळे प्रकृतीवर होणारे दुष्परिणामही त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. प्रारंभी शासनाच्या आरोग्य विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना उपक्रमांची माहिती आरोग्य सेवक प्रज्वल खेडकर यांनी दिली.

यावेळी जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी व उर्दू शाळेचे मुख्याध्यापक अनुक्रमे प्रकाश विंचूरकर, अफसर खान, शिक्षक देवानंद बागडे, रंजना परतेती, शहनाज परवीन, शबनम वसीम शहा, परवीन शोएब बहिना आदी उपस्थित होते.

# पतंजलि विद्यापीठात सनातन संस्कृती आणि भारतीय ज्ञान परंपरेचा तीन दिवसीय महाकुंभ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**हरिद्वार** – भारतीय ज्ञान परंपरा, सनातन मूल्ये आणि हिंदू दर्शनाची जागतिक प्रासंगिकता अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने हरिद्वार येथील पतंजलि विद्यापीठात ५२ व्या अखिल भारतीय प्राच्यविद्या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे तीन दिवसीय संमेलन २९ ते ३१ ऑक्टोबर २०२६ दरम्यान पार पडणार आहे. या महाकुंभात देश-विदेशातील अनेक दिग्गज विद्वान, शिक्षणतज्ज्ञ आणि विचारवंत एकत्र येऊन प्राच्यविद्या, भारतीय दर्शन, संस्कृती, इतिहास, संस्कृत भाषा आणि प्राचीन ज्ञान परंपरेच्या विविध पैलूंवर सविस्तर विचार-विमर्श करणार आहेत.



स्वामी रामदेव आणि आचार्य बालकृष्ण यांच्याकडून तयारीचा आढावा मंगलवारी पतंजलि विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील कॉन्फरन्स हॉलमध्ये योगगुरू स्वामी रामदेव आणि आचार्य बालकृष्ण यांनी या दिव्य आणि भव्य संमेलनाच्या पूर्वतयारीची सविस्तर पुनरावलोकन बैठक घेतली. संमेलनाचे आयोजन अतिशय शिस्तबद्ध, गुणवत्तेसह आणि सर्व विभागांच्या परस्पर समन्वयाने व्हावे, असे आवाहन स्वामी रामदेव यांनी सर्व संबंधितांना केले. इतक्या मोठ्या आणि व्यापक कार्यक्रमाची यशस्विता ही सूक्ष्म नियोजन, संघभावना आणि समर्पणावर अवलंबून असते, असे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीत पतंजलि विद्यापीठाचे कुलगुरू आचार्य बालकृष्ण, उपकुलगुरू साध्वी देवप्रिया, डॉ.वेदप्रिया, पारुल, मयंक अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

# नाशिकमध्ये राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे आगमन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे आज, २८ ऑक्टोबर रोजी सकाळी नाशिक येथील पोलीस परेड ग्राउंड हेलिपॅडवर आगमन झाले. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन हेही त्यांच्यासोबत उपस्थित होते.

राज्यपालांच्या आगमनप्रसंगी विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम यांनी प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत केले. यावेळी नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके-आहेर, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय ऐनापुरे, पोलीस आयुक्त डॉ.संदीप कर्णिक, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री आणि जिल्हाधिकारी आयुष प्रसाद उपस्थित होते.



याशिवाय जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.संजीव सोनवणे, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.व्यंकट गीते, अपर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अर्पिता ठुबे, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते. मविप्रचे सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे आणि तहसीलदार पंकज पवार यांचीही यावेळी उपस्थिती होती.

### जाहीर नोटीस

**रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ चे कलम १३ ( ३ ) नूसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब ( प्रथम श्रेणी ) यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.२४९/२०२६** **ने.ता.०८/१२/२०२६**

अर्जदार :- कु.प्राची प्रदिपराव धुर्वे
वय अं.२१ वर्ष, धंदा-शिक्षण
रा.फत्तेपुर, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** सचिव साहेब
ग्रामपंचायत कार्यालय-मोरचुंद, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी त्यांची **आई मयत संगिता प्रदिपराव धुर्वे यांचा मृत्यू दि.०४/१०/२०२१ रोजी फत्तेपुर, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त मृत्यूची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार मृत्यूची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील **मयत संगिता प्रदिपराव धुर्वे यांचा मृत्यू दि.०४/१०/२०२१ रोजी फत्तेपुर, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.०८/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२७/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ चे कलम १३ ( ३ ) नूसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब ( प्रथम श्रेणी ) यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.२९५/२०२६** **ने.ता.१९/१२/२०२६**

अर्जदार :- राजारामसिंह गोपालसिंह बघेले
वय अं.७६ वर्ष, धंदा-काही नाही
रा.एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** सचिव साहेब
ग्रामपंचायत कार्यालय-एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे राजारामसिंह गोपालसिंह बघेले यांचा जन्म दि.२३/०२/१९५० रोजी मु.पो.एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे राजारामसिंह गोपालसिंह बघेले यांचा जन्म दि.२३/०२/१९५० रोजी मु.पो.एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.१९/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२२/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# यशवंत माऊली भजन मंडळातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**चांदस वाठोडा** – एस.जी.देशमुख लिटिल स्टार कॉन्व्हेंट व सुमनबाई उपासे नेक्सस इंटरनॅशनल स्कूल येथे यशवंत माऊली भजन मंडळ वाठोडा यांच्यातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांसाठी आर्थिक मदत देण्यात आली.




शनिवारी आयोजित सुरांच्या मैफिलीत मंडळाच्या सदस्यांनी गझल व गीतांचे सादरीकरण करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. गेल्या काही वर्षापासून मंडळाचे सदस्य आपल्या सुमधुर आवाजातून वरुड तालुक्यातील रसिकांना मंत्रमुग्ध करत असून, संतांच्या चरणी संगीतमय आदरांजली अर्पण करीत आहेत. या संगीतसेवेतून मिळालेली आर्थिक मदत त्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनासाठी दिली. या रकमेतून विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन त्यांच्या सुप्त गुणांना वाव द्यावा, अशी विनंती मंडळाने शाळा प्रशासनाला केली. यावेळी संस्थेचे सचिव अनिल कांबळे, मुख्याध्यापिका रोशनी कांबळे, यशवंत माऊली भजन मंडळाचे नंदकिशोर चोबितकर, चंद्रशेखर वाघ व तुषार चोबितकर उपस्थित होते.

# विमानातील दहशतवादी हल्ल्याचा सामना करणाऱ्या स्मित मच्छार यांचा युएई कडून सन्मान

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

**नवी दिल्ली** – विमानातील गंभीर हल्ल्याच्या प्रसंगी प्रवाशांचे प्राण वाचवण्यासाठी धैर्य दाखवणारे फ्लायदुबईच्या फ्लाइट एफझेड १०७३ चे कॅप्टन स्मित मच्छर यांचा संयुक्त अरब अमिरातीने विशेष सन्मान केला आहे. युएईचे राष्ट्रपती शेख मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान यांनी कॅप्टन मच्छर आणि त्यांच्या क्रू सदस्यांना 'फर्स्ट-क्लास ऑर्डर ऑफ झायेद खख' हा पुरस्कार प्रदान केला. दुबईचे युवराज शेख हमदान बिन मोहम्मद बिन रशीद अल मक्तूम यांच्या हस्ते हा सन्मान देण्यात आला. राष्ट्रपती शेख मोहम्मद बिन झायेद यांनी मंगळवारी क्रू सदस्यांची भेट घेऊन त्यांच्या धैर्याचे आणि जबाबदारीचे कौतुक केले. प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचीही प्रशंसा करण्यात आली. ३० सप्टेंबर रोजी दुबईहून तेल अवीवकडे जाणाऱ्या फ्लायदुबईच्या एफझेड१०७३ विमानात कॉकपिटमध्ये गंभीर घटना घडली. उपलब्ध वृत्तानुसार, सहवैमानिकाने कॅप्टन स्मित मच्छर यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात कॅप्टन मच्छर जखमी झाले. परिस्थिती गंभीर झाल्यानंतर विमानाचा मार्ग बदलून सौदी अरेबियातील तबूक येथे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. या संकटाच्या वेळी कॅप्टन मच्छर यांनी कॉकपिटचा दरवाजा उघडण्यात यश मिळवले. त्यानंतर प्रवासी आणि कर्तव्यावर नसलेल्या क्रू सदस्यांनी आत प्रवेश करून हल्लेखोराला रोखण्यास मदत केली.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९४९/२०२६** **ने.ता.०३/१२/२०२६**

**अर्जदार :-**

१) गोधाबाई महादेवराव राजगुरु, वय अं.८३ वर्ष, धंदा-गृहिणी

२) दुर्गा सुखदेवराव बानाईत, वय अं.६३ वर्ष, धंदा-गृहिणी

३) सिंधु नामदेवराव बारमासे, वय अं.७५ वर्ष, धंदा-गृहिणी

अर्जदार क्र.१ ते ३ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत शेवंताबाई तुकाराम पांडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२१/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९४८/२०२६** **ने.ता.०४/१२/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती शांता नारायण बागडे, वय अं.७५ वर्ष, धंदा-गृहिणी, २) अनिलकुमार नारायणराव बागडे, वय अं.५७ वर्ष, धंदा-नोकरी, ३) विनोद नारायण बागडे, वय अं.४५ वर्ष, धंदा-मजुरी, ४) प्रमोद नारायण बागडे, वय अं.४३ वर्ष, धंदा-मजुरी, अर्जदार क्र.१ ते ४ रा.बेनोडा, ता.वरुड, ५) सौ.उमा मधुकर चंद्रीकापुरे, वय अं.४० वर्ष, धंदा-गृहिणी, रा.पांढुर्णा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **नामे मयत गोदाबाई सुर्यभान उईके, रा.महेंद्री, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०४/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२१/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ चे कलम १३ ( ३ ) नूसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब ( प्रथम श्रेणी ) यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.२५३/२०२६** **ने.ता.२५/११/२०२६**

**अर्जदार :-** सौ.सिमा संजय कुमरे

वय अं.३४ वर्ष, धंदा-मजुरी

रा.दुर्गे हॉस्पीटल, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** मुख्याधिकारी साहेब

नगर परिषद, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी त्यांची **मुलगी नामे रुद्राक्षी संजय कुमरे हिचा जन्म दि.०१/११/२०२१ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांची **मुलगी नामे रुद्राक्षी संजय कुमरे हिचा जन्म दि.०१/११/२०२१ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.२५/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१६/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ चे कलम १३ ( ३ ) नूसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब ( प्रथम श्रेणी ) यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.२६०/२०२६** **ने.ता.११/१२/२०२६**

**अर्जदार :-** मनिषा भारत गेडाम

वय अं.३६ वर्ष, धंदा-मजुरी

रा.धनोडी, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** मुख्याधिकारी साहेब

नगर परिषद, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी त्यांची **मुलगी नामे राधीका भारत गेडाम हिचा जन्म दि.२४/१०/२०२१ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांची **मुलगी नामे राधीका भारत गेडाम हिचा जन्म दि.२४/१०/२०२१ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.११/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२३/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# मुंबई, कोकणातील शिक्षकांना मोठा दिलासा; सोमवार ते शुक्रवार केवळ अध्यापनाचे काम, माहिती संकलनासाठी शनिवार निश्चित

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**



**मुंबई** – शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता भार कमी करण्यासाठी शिक्षण संचालनालयाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मुंबईसह कोकण विभागातील ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील शाळांच्या मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून सोमवार ते शुक्रवारदरम्यान कोणत्याही प्रकारची ऑनलाइन किंवा ऑफलाइन माहिती मागवू नये, असे लेखी आदेश शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. शाळांमधील शिक्षकांकडून सरल, यू-डायस, आधार अद्ययावत करणे, मध्यान्ह भोजन योजना यांसह विविध शैक्षणिक योजनांची माहिती वारंवार मागवली जाते. ऑनलाइन पोर्टलवर माहिती भरणे तसेच ऑफलाइन अहवाल तयार करण्याच्या कामामुळे शिक्षकांचा मोठा वेळ खर्च होत असून, प्रत्यक्ष अध्यापनावर त्याचा परिणाम होत असल्याच्या तक्रारी सातत्याने केल्या जात होत्या. शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा भार कमी करून त्यांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळावा, यासाठी शिक्षक महासंघाचे मुंबई व कोकण विभागाचे अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी १९ ऑक्टोबर २०२६ रोजी शिक्षण संचालकांकडे लेखी तक्रार केली होती.

## जाहीर नोटीस

**रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ चे कलम १३ ( ३ ) नूसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब ( प्रथम श्रेणी ) यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.२४२/२०२६** **ने.ता.११/१२/२०२६**

**अर्जदार :-** साईफुल आलम अब्दुल सलाम

वय अं.४४ वर्ष, धंदा-मजुरी

रा.ब्राम्हणपुरी, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** मुख्याधिकारी साहेब

नगर परिषद, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी त्यांचा **मुलगा नामे शेख मेहेराज आलम साइफुल आलम याचा जन्म दि.०९/०१/२०२० रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **यांचा मुलगा नामे शेख मेहेराज आलम साइफुल आलम याचा जन्म दि.०९/०१/२०२० रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.११/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२२/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ चे कलम १३ ( ३ ) नूसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब ( प्रथम श्रेणी ) यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.२६४/२०२६** **ने.ता.१४/१२/२०२६**

**अर्जदार :-** प्रगती सुनिल राऊत

वय अं.२६ वर्ष, धंदा-शिक्षण

रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** सचिव साहेब

ग्रामपंचायत कार्यालय लोणी, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे प्रगती सुनिल राऊत हिचा जन्म दि.०३/०८/२००१ रोजी मु.पो.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे प्रगती सुनिल राऊत हिचा जन्म दि.०३/०८/२००१ रोजी मु.पो.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.२६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२३/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ ( ३ ) सुधारित अधि.२०२६ च्या कलम ३ ( अ ) अन्वये मृत्यूची नोंद वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्यायाधिश, वरुड यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.२३६/२०२६** **ने.ता.१०/१२/२०२६**

**अर्जदार :-** दिनेश किसनराव पाचपोहर

वय अं.३९ वर्ष, धंदा-शेती

रा.काटी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** मा.सचिव, साहेब

ग्रामपंचायत कार्यालय काटी, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे पुंजाबाई नथ्थुजी उर्फ नत्थुजी पाचपोहर यांचा मृत्यू दि.१५/०४/१९९९ रोजी वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) व सुधारित ॲक्ट २०२६ चे कलम ३ (अ) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या **पुंजाबाई नथ्थुजी उर्फ नत्थुजी पाचपोहर यांचा मृत्यू दि.१५/०४/१९९९ रोजी वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.१०/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२२/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ ( ३ ) सुधारित अधि.२०२६ च्या कलम ३ ( अ ) अन्वये मृत्यूची नोंद वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्यायाधिश, वरुड यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.२८१/२०२६** **ने.ता.२६/११/२०२६**

**अर्जदार :-** कुमुद नामदेव ठाकरे

वय अं.६१ वर्ष, धंदा-मजुरी

रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** मुख्याधिकारी साहेब नगर परीषद कार्यालय-वरुड

ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **पती नामे नामदेव राघोबाजी ठाकरे यांचा मृत्यू दि.०१/०८/२००७ रोजी वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) व सुधारित ॲक्ट २०२६ वे कलम ३ (अ) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास **नामदेव राघोबाजी ठाकरे यांचा मृत्यू दि.०१/०८/२००७ रोजी वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.२६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# दुष्काळाचे गांभिर्य ओळखुन दुर्गामुर्तीचे जलविसर्जन टाळले

## वरुडच्या महात्मा फुले दुर्गा मंडळाचा ऐतिहासिक निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – यावर्षीची दुष्काळी परिस्थिती आणि पाणीटंचाईचे गांभीर्य लक्षात घेऊन वरुड शहरातील महात्मा फुले दुर्गा मंडळाने दुर्गामूर्तींचे पाण्यामध्ये विसर्जन न करण्याचा ठाम निर्णय घेतला आहे. धार्मिक परंपरेसोबतच सामाजिक जबाबदारीला प्राधान्य देणाऱ्या मंडळाच्या या निर्णयातुन समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण झाला आहे.



'पाणी वाचवणे हीच काळाची गरज' हा विचार कृतीत उतरवत मंडळाने जलविसर्जन टाळण्याचा निर्णय घेतला. एकीकडे दुष्काळामुळे नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असताना दुसरीकडे उत्सवांमध्ये पाण्याचा वापर जपून करण्याची गरज आहे. हीच जाणीव ठेवून महात्मा फुले दुर्गा मंडळाने घेतलेला हा निर्णय विशेष महत्त्वाचा ठरत आहे. मर्यादित असलेला जलसाठा दुषीत होवु नये व पर्यावरणाची हानी होवु नये, या उद्देशाने मंडळाने हा निर्णय घेतल्याचे कळते.

**श्रद्धेपेक्षा नाही, तर श्रद्धेसोबत पर्यावरणाचीही जबाबदारी!**

दुर्गोत्सव हा भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा सण आहे. मात्र, उत्सव साजरा करताना पर्यावरणाचे रक्षण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे, ही भूमिका स्वीकारत महात्मा फुले दुर्गा मंडळाने मुर्तीचे जलविसर्जन न करण्याचा निर्णय घेत केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला आहे. मंडळाने पर्यावरणपुरक कार्यक्रमांचेही आयोजन करून सामाजिक जाणीव जागृत करण्याचा प्रयत्न केला. धार्मिक उत्सवांच्या माध्यमातुन पाणी बचत, पर्यावरण रक्षण आणि सामाजिक बांधिलकी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर जनजागृती करता येते, हे मंडळाने दाखवुन दिले.

**इतर मंडळांसाठीही प्रेरणादायी पाऊल**

दुष्काळाच्या पार्श्वभुमीवर महात्मा फुले दुर्गा मंडळाने घेतलेला हा निर्णय इतर सार्वजनिक मंडळांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. उत्सवांचा आनंद कायम ठेवत निसर्गाप्रती आपली जबाबदारी पार पाडता येते, हे या निर्णयातून अधोरेखित झाले आहे. महात्मा फुले दुर्गा मंडळाचा हा निर्णय म्हणजे केवळ जलविसर्जन टाळण्यापुरता मर्यादित नसून पाण्याचे महत्त्व ओळखुन समाजाने पर्यावरण संवर्धनासाठी पुढे येण्याचे आवाहन आहे. दुष्काळी परिस्थितीत पाण्याची बचत आणि पर्यावरणाचे संरक्षण यांना प्राधान्य देत मंडळाने वरुड शहरासमोर सामाजिक भान जपणारा आदर्श ठेवला आहे.

या कार्याकरीता न.प.आरोग्य समिती सभापती विनय खासबागे, नगरसेवक संदीप देवते, प्रविण रडके, आशिष बंदे, दिपम यावलकर, अनुज यावलकर, कुणाल देवते, अश्विन काळे, प्रज्वल यावलकर, चेतन देवते, नयन देवते, शिरिष देवते, विनित काळे, आर्यन वरखेडकर, तेजस काळे, आदित्य आंडे, अमित देवते, ओंकार देवते, निलेश कुबडे, निखिल बुवाडे, प्रथमेश आंडे, तन्मय खासबागे, ऐश्वर्या खासबागे, मनिष माळोदे, पार्थ लाखे, प्रतिक यावलकर, सुप्रिया आशिष बंदे, सीमा आशिष कुबडे, सुनिता प्रवीण रडके, आरुषा तन्मय खासबागे, माहेश्वरी तेजस काळे, प्रज्ञा अश्विन काळे, डॉ.मिना सुधाकर बंदे, जोशना संदीप देवते, पूनम चेतन देवते, राधा तुषार देवते, प्रज्ञा अनुज यावलकर आदींनी परिश्रम घेतले.

## ५ हजार रुपये अग्रीम रक्कम देण्याच्या निर्णयाविरोधात

# शेतकरी सागर फरतोडे यांनी मुंडन करुन केला निषेध

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शासनाने शेतकऱ्यांना दिवाळीपुर्वी ५ हजार रुपये अग्रीम रक्कम देण्याच्या निर्णयाविरोधात आज तहसिल कार्यालयासमोर शेतकरी सागर फरतोडे यांनी मुंडन करुन निषेध केला.




पावसाची अनिश्चितता, पाणी टंचाई, पिकांचे नुकसान आणि शेतीच्या वाढता खर्च यामुळे शेतकरी संकटाचा सामना करीत आहे. यात राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा राहण्याची वेळ आहे परंतु दिवाळी आधी ५ हजार रुपये अग्रीम रक्कम देऊन शेतकऱ्यांची मुख्यमंत्री साहेबांनी थंटटा केली आहे, तेव्हा राज्य शासनाच्या या निर्णयाचा विरोध म्हणुन शेतकरी सागर फरतोडे यांनी तहसील कार्यलय समोर मुंडन करुन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळी आधी ५० हजार रुपये अग्रिम रक्कम न देता संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना १ लाख रुपये आणि अन्य शेतकऱ्यांना ५० हजार रुपये दिवाळी आधी आर्थिक मदत करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.




याकरीता सागर फरतोडे यांनी केलेल्या मुंडन आंदोलनास उपस्थित राहून आक्रोश जनशक्ती संघटना अध्यक्ष सुशील बेले, युवा मित्र मंडळ पुसला अध्यक्ष सुरज धर्मे, पिंटू कोरडे, आभिषेक जाधव, सुरज बिसंद्रे, अमर इवनातें, कमलेश खपरीये, तेजस राऊत, विलास मांगलकर, विनोद मांगलकर, ज्ञानेश्वर देशमुख व ईतर शेतकऱ्यानी पाठिंबा दिला.

## शेतकऱ्याला नडाल, तर याद राखा - एकनाथ शिंदे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना कर्जवसुलीसाठी त्रास देणाऱ्या मायक्रो फायनान्स कंपन्या, फायनान्स कंपन्या, बँका आणि सावकारांविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना दिला. शेतकऱ्याला नडणाऱ्याला बिल्कूल सोडणार नाही, असेही त्यांनी बजावले. नांदेडमधील सक्तीच्या कर्जवसुलीच्या घटनेचा संदर्भ देत शिंदे यांनी अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी सरकारने ठाम भूमिका घेतल्याचे सांगितले.

# युवा शेतकऱ्याची विष प्राशुन आत्महत्या

## नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे टोकाचे पाऊल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**शेंदूरजनाघाट** – नापिकी आणि कर्जाच्या विवंचनेत असलेल्या शेंदूरजनाघाट येथील प्रवीण श्रीधरपंत अढावू (वय ४४) या शेतकऱ्याचा विष प्राशन केल्यानंतर उपचारादरम्यान मृत्यू झाला. सोमवारी (२६ ऑक्टोबर) सायंकाळी ही घटना घडली. मंगळवारी पहाटे अमरावती येथे उपचार सुरु असताना त्यांची प्राणज्योत मालवली.



प्राप्त माहितीनुसार, प्रवीण अढावू यांच्याकडे सामायिक सात एकर ओलिताखालील शेतजमीन होती. स्टेट बँकेचे सुमारे २ लाख ५० हजार रुपये कर्ज तसेच खासगी उसनवारीचे कर्ज असल्याची माहिती आहे. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत खरीप पिकाचे नुकसान झाल्याने उत्पादन खर्चही निघाला नव्हता. त्यामुळे कर्जाची परतफेड कशी करावी, या चिंतेत ते होते.

सोमवारी सायंकाळी घरी कुणी नसताना त्यांनी विषारी पदार्थ प्राशन केला. त्यानंतर प्रकृती बिघडल्याचे त्यांच्या पुतणीच्या लक्षात आले. तिने ही माहिती कुटुंबीयांना दिल्यानंतर नातेवाइकांनी त्यांना वरुड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी अमरावती येथे हलविण्यात आले. मात्र, मंगळवारी पहाटे एक वाजताच्या सुमारास उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदन केल्यानंतर मृतदेह नातेवाइकांच्या स्वाधीन करण्यात आला. त्यांच्या पश्चात वृद्ध आई, भाऊ, पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.




